# बालविकास

## प्रस्तावना :

बालविकास म्हणजे ''बालकांचा विकास'' बालविकासाचा अभ्यास प्राचीन काळापासून केला जातो परंतु तेव्हा त्याला शास्त्रीय आधार नव्हता बालविकासामध्ये गर्भधारणे पासून होतो. गर्भधारणा ते किशोरावस्था या काळात बालकांची वृद्धी व विकास होतो त्यामुळे या कालखंडाला बालविकासाचा अध्ययन काळ म्हटले जाते.

## बालविकासाची व्याख्या :

विविध शास्त्रज्ञांनी बालविकासाच्या अनेक व्याख्या तयार केलेल्या आहेत. त्याखालील प्रमाणे जेम्स ड्रेव्हर

१) जेम्स ड्रेव्हर - यांच्या मते,‘‘बालमानसशास्त्र ही मानसशास्त्राची शाखा असून त्यामध्ये मानवाच्या जन्मापासून ते परिवक्वतेच्या अवस्थेपर्यंतचा अभ्यास केला जोतो.

२) क्रो आणि क्रो - यांच्यामते,‘बालमानसशास्त्र म्हणजे व्यक्तिविकासाचे गर्भावस्थेपासून ते किशोरावस्थे पर्यंतचे वैज्ञानिक पध्दतीने केलेले अध्ययन होय.

## बालविकासाचे महत्त्व :

१) बालविकासाची सुरूवात गर्भधारणेपासून होते तेव्हा त्यादृष्टीने तेव्हापासूनच योग्य ती काळजी घेता येईल.

२) गर्भावस्थेच्या काळात मातेचा आहार, आरोग्य तपासणी, औषधे व लसीकरण इ. चा वेळच्या वेळी आढावा घेऊन बालविकासाला पोषक वातावरण तयार करता येईल.

३) बालअवस्थेतील बालकांचे आजार तसेच अपघात यांची विशेष काळजी घेता येते.

४) बालअवस्थेतील वर्तनसमस्यांची कारणे परिणाम व उपाययोजना याची माहिती बालविकासाच्या अध्ययनाने प्राप्त होते.

५) बालविकासात बालकांच्या वाढीची व विकासाची जी प्रेरके व मारके आहेत त्यांची  माहिती प्राप्त होते.

# बालविकासाची व्याप्ती :



विकासाच्या अवस्थांचे अध्ययन
असाधारण व अपसामान्य बालकांचे अध्ययन
बालविकासाची व्याप्ती
बालविकासाच्या विविधअंगाचे अध्ययन
मनसिक स्वास्थ विज्ञानाच्या मूलभूत सिद्धांतांचे अध्ययन
बालविकासाला प्रभावित करणाऱ्या घटकांचे अध्ययन

## याव्यतिरिक्त पुढील घटकांचाही अभ्यास या शास्त्रामध्ये करण्यात येते :

- बालसंगोपन पध्दती
- पालक - बालक सबंध
- बालकाच्या वर्तन समस्याचे अध्ययन
- बालविकासाची तत्वे

## वाढ व विकास :

मानवी आयुष्यात वाढ व विकास हे दोन घटक अतिशय महत्वपूर्ण आहेत. बरेचदा वाढ व विकास हे दोन शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. ‘‘वाढ हा परिमाणात्मक बदल असून तो शरीराच्या आकारात व रचनेत होतो.’’

तर व्यक्तितील गुणात्मक बदलांना विकास म्हणतात. ‘‘परिपक्वतेच्या दिशेने टाकलेले प्रत्येक पाऊल म्हणजे विकास होय’’ असे शरयू बाल म्हणतात.

## वाढीची वैशिष्टये :


१)	वाढ दृश्य असते.
२)	वाढ संख्यात्मक असते.
३)	वाढीचे मापन करता येते.
४)	वाढीचे निरिक्षण करता येते.
५)	वाढ विशिष्ट मर्यादेनंतर थांबते.

## विकासाची वैशिष्टये :

१)	विकास गुणात्मक बदल होय.
२)	विकास सतत मृत्यूपर्यंत सुरू असतो.
३)	विकासाची गती भिन्न असते.
४)	विकास मोजता येत नाही.
५)	विकासाचा निश्चित क्रम ठरलेला असतो.

# विकासाच्या अवस्था :

व्यक्तिला जीवनात विविध अवस्थामधून जावे लागते. विकासाच्या अवस्था गर्भधारणेपासुन ते मृत्यूपर्यंत विभागल्या गेल्या आहेत.



## वाढ व विकासाची तत्वे :

१) विकासात सातत्य असते

२) विकास विशिष्ट क्रमामध्ये होतो

1) मस्तकानूवर्तीक्रम
2) अक्षानूवर्तीक्रम
3) विकास सामान्याकडून विशेषाकडे होतो
4) विकासात व्यक्तिगत भिन्नता आढळते.
5) विकास प्रक्रियेतील गतीभिन्नता आढळते.
6) विकासाच्या प्रत्येक अवस्थेचे वैशिष्ट्ये असते.
7) विकास अवस्थेनुसार पुढे जातो.
8) विकासात परस्पर संबंध असतो.

## वाढ व विकासाला मारक व प्रेरक ठरणारे घटक :

### वाढ व विकासाला मारक ठरणारे घटके हे खालीलप्रमाणे आहेत.

१) जन्मपूर्व काळातील धोके - जसे मातेचे वय जास्त असल्यास मातेला झालेले आजार इत्यादी.

२) मंदबुद्धी

३) अनुवांशिक दोष

४) शारिरीक दोष

५) आजारपण

६) प्रतिकूल कौटूंबिक वातावरण

७) अंत:स्त्रावी ग्रंथीच्या कार्यातील दोष

८) आरोग्य संगोपण पद्धती

९) कुपोषण

# वाढ व विकासाला चालना देणारे घटक :

१) अनुकल परिरिस्थिती किंवा वातावरण

२) पोषक आहार

३) विश्रांती व झोप

४) संधी

५) कुटूंबातील सदस्यांचा दृष्टीकोण

## वाढ व विकासावर अनुवंशिकता व तावरणाचा प्रभाव :

### अनुवंशिकता :

वंशपरंपरेनुसार जे गुण व दोष पुढील पिढीत संक्रमित होतात त्याला आनुवंशिकता असे म्हणतात.

रूथ बेनेडिक्टच्या मते ''आनुवंशिकता म्हणजे मातापित्याकडून बालकांना प्राप्त होणारे गुण होय''

आनुवंशिकता ही बालकास मिळालेली जन्मजात देणगी आहे. आनुवंशिकतेने जे गुणधर्म बालकामध्ये संक्रमित होतात ते म्हणजे त्वचेचा रंग, केसाचा रंग व कुरळेपणा, डोळ्याचा रंग इत्यादी तर बुद्धीमत्ता स्वभाव कल्पनाशक्ती इत्यादी मानसिक गुणवैशिष्ट्ये होत.

## आनुवंशिकतेचे परिणाम :

**आनुवंशिकतेचे शिशुवर होणारे परिणाम पुढीलप्रमाणे आहे.**

१) शारिरीक लक्षणे

२) कलागुण

३) खेळ

४) बुद्धीमत्ता

५) मानसिक गुणधर्म

**आनुवंशिक दोष/रोग**

१) एड्स

२) रंग अंधता


३) सिकलसेल

४) रक्तगट

# वातावरण :

वातावरणात आजूबाजूचा अवतीभवतीचा परिसर त्यात आढळणाऱ्या प्रत्येक व्यक्ती व वस्तूचा समावेश होतो. व्यक्तिच्या जडणघणीत वातावरणाचा खूप मोठा हातभार असतो.

## वातावरण दोन प्रकारचे असतात :



# वाढ व विकासातील फरक

| वाढ | विकास |
|---|---|
| संख्यात्मक बदल | गुणात्मक बदल |
| मूर्त स्वरूप | अमूर्त स्वरूप |
| मोजमाप करता येते | मोजमाप करता येत नाही |
| विशिष्ट काळापुरतीच मर्यादित | सतत चालणारी |
| संकूचित संकल्पना | विस्तृत संकल्पना |
| परिपक्वते नंतर थांबते | मृत्युपर्यंत सुरू असते |

## वाढ व विकासावर परिणाम करणारे घटक :

१) अनुवंशिकता
२) वातावरण
३) पोषण
४) परिपक्वता
५) अध्ययन
६) अंत:स्त्रावी ग्रंथी
७) आजार
८) शारिरीक दोष
९) व्यायाम व विश्रांती
१०) संधी
११) लिंगभेद
१२) प्रजाती
१३) संस्कृती

# THANK YOU !